## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## प्रमुख पाहुणेः प्रदीप निफाडकर (कवी, गझलकार)

| | |
|---|---|
|  |  |
| प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख,<br>डॉ. विजयकुमार खंदारे | उपस्थित प्राध्यापक, विद्यार्थी |



**तळेगाव स्टेशन : मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना गझलकार प्रदीप निफाडकर.**

# प्रेमातूनच जातिअंताची उकल शक्य : निफाडकर

**तळेगाव स्टेशन, ता. १८** : "प्रेम ही उदात्त संकल्पना आहे. तिला विनाकारण बदनाम केले जाते. महाविद्यालयीन युवकांनी प्रेमाचा सात्त्विक अनुभव घेत आयुष्याला सामोरे जावे. त्यातून जातिअंतासारख्या मोठ्या प्रश्नाची उकल सहज शक्य आहे," असे मत गझलकार प्रदीप निफाडकर यांनी व्यक्त केले.

इंद्रायणी महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या उद्घाटन कार्यक्रमात निफाडकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, डॉ. प्रमोद बोराडे यांच्यासह प्राध्यापक आणि विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

निफाडकर म्हणाले, "प्रेमात लिहिलेली गझल जगण्याला उर्मी देते. तर, दु:खातील गझल वेदनांचा निचरा करते. मराठी ही जगातील अत्यंत सुंदर भाषा असून, मातृभाषा म्हणून आपल्याला मराठीचा अभिमान असायला हवा, यासाठी आपण शक्य असेल तेथे मराठीचाच आग्रह धरायला हवा. पंधराव्या शतकापासूनचा गझलेचा प्रवास उलगडून सांगताना गझलेचे शब्दवैभव आणि त्यातील व्याकरणाची सखोल माहिती उपस्थितांना करून त्यांनी करून दिली. प्रा. सत्यजित खांडगे यांनी निफाडकर यांचा शब्दगौरव केला. मराठी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार खंदारे यांनी प्रास्ताविकात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची रूपरेषा स्पष्ट करतानाच निफाडकर यांच्या समृद्ध लेखनप्रवासाचा परिचयदेखील करून दिला. इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे, कार्यवाह चंद्रकांत शेटे यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन डॉ. संदीप कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. राजेंद्र आठवले यांनी मानले.

# काही क्षणचित्रे...


इंद्रायणी महाविद्यालय
मराठी विभाग आयोजित
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा


इंद्रायणी महाविद्यालय
मराठी विभाग आयोजित




Department Of English


Indrayani Mahavidyalaya
Department Of English